**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -440022**
**Website :** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-** : vanarti.info@gmail.com

जा .क्र.वनार्टी /नागपूर/आस्था/ ४७५ /२०२६-२७ दिनांक :-१२/०६/२०२६

# विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJ-NT) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी छत्रपती संभाजीनगर येथे डिजिटल लायब्ररी (डिजिटल वाचनालय) व अभ्यासिका सुविधा योजना, 2026-27

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती-भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर मार्फत डिजिटल लायब्ररी (डिजिटल वाचनालय) व अभ्यासिका सुविधा योजना कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) संस्थेच्या उद्देशपत्रिकेत वनार्टीच्या लाभार्थ्यांना अभ्यासासाठी वाचनालय सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट नमूद आहे. त्यामुळे वनार्टीच्या लाभार्थ्यांना वाचनालयाचा लाभ उपलब्ध करून दिल्यास त्यांची अभ्यासात प्रगती होऊन त्यांना करिअर घडविण्यासाठी सहाय्य होणार आहे पर्यायाने त्यांची शैक्षणिक प्रगती साधली जाणार आहे. महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नॉन-क्रिमिलेअर गटातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक अभ्यासासाठी आवश्यक वाचनालय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) मार्फत प्रायोगिक तत्त्वावर छत्रपती संभाजीनगर येथे डिजिटल लायब्ररी (डिजिटल वाचनालय) व अभ्यासिका सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

## अ. योजनेच्या लाभासाठी पात्रता :

१) विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी. छत्रपती संभाजीनगर जिल्यातील विद्यार्थ्यांला प्राधान्य
२) विद्यार्थी हा नॉन-क्रिमिलेअर गटातील विमुक्त जाती (VJ-A) / भटक्या जमाती (NT-B, NT-C, NT-D) प्रवर्गातील असावा/असावी.
३) छत्रपती संभाजीनगर येथे एकूण २०० विद्यार्थ्यांना डिजिटल लायब्ररी (डिजिटल वाचनालय) सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल
४) या वाचनालयामार्फत वनार्टीद्वारे विद्यार्थ्यांना डिजिटल पद्धतीने ई-बुक, ई-मासिके व इतर साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल.यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा लाभ देण्यात येणार नाही.
५) या शिवाय अभ्यासासाठी जागा व निविदा प्रारूपात नमूद आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा देखील पुरविण्यात येतील.
६) लाभार्थ्यांची निवड ही त्यांना नजीकच्या काळात प्राप्त झालेल्या (उदा. १२ वी / पदवी मधील वर्ष निहाय / पदव्युत्तर मधील वर्ष निहाय) गुणांकनानुसार मेरीटद्वारे करण्यात येईल.

७) जागांचे वाटप खालीलप्रमाणे राहील :

| अ.क्र. | तपशील | जागा वाटपाची टक्केवारी | नागपूर |
|---|---|---|---|
| १. | १२ वी विज्ञान / वाणिज्य/कला | २०% | ४० लाभार्थी |
| २. | पदवी | ४०% | ८० लाभार्थी |
| ३. | पदव्युत्तर | ४०% | ८० लाभार्थी |
| | **एकूण** | **१००%** | **२०० लाभार्थी** |

८) लाभार्थ्यांची निवड गुणवत्तेनुसार (Merit) करण्यात येईल.

९) स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

१०) उपलब्ध असलेल्या प्रवेश क्षमतेच्या जागांसाठी नमूद शैक्षणिक संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर शैक्षणिक संवर्गातील पात्र उमेदवारांना सदर जागा ट्रान्सफर करून प्रवेश दिला जाईल.

११) पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी वनार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**ब. अर्ज करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे :-**

१) आधार कार्ड (पुढील व मागील बाजूसह)
२) रहिवासी दाखला (Domicile Certificate)
३) जात प्रमाणपत्र (Caste Certificate)
४) नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र
५) 12 वी /पदवी/पदव्युत्तर गुणपत्रक
६) दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र
७) अनाथ असल्यास प्रमाणपत्र
८) पासपोर्ट आकाराचा फोटो

**क. आरक्षण :-**

**सामाजिक प्रवर्गनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | सामाजिक प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विमुक्त जाती - अ (VJ-A) | ४०% |
| २ | भटक्या जमाती - ब (NT-B) | २२.५०% |
| ३ | भटक्या जमाती - क (NT-C) | २२.५०% |
| ४ | भटक्या जमाती - ड (NT-D) | १५% |
| **एकूण-** | | **१००%** |

**समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे :-**

1. प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा आरक्षित राहतील.
2. दिव्यांगांसाठी 5% जागा आरक्षित राहतील.
3. अनाथांसाठी 1% जागा आरक्षित राहतील.
4. उपलब्ध असलेल्या सामाजिक प्रवर्गनिहाय प्रवेश क्षमतेनुसार संबंधित जात प्रवर्ग अथवा सामाजिक आरक्षण प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास, रिक्त राहिलेल्या जागा इतर उपलब्ध विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJ-NT) प्रवर्गातील पात्र उमेदवारांना नियमानुसार हस्तांतरित करून प्रवेश देण्यात येईल

**ड. अर्ज कसा करावा :-**

1. वनार्टीच्या www.vanarti.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "**Application for Digital Library Facility Program (Chhatrapati Sambhajinagar)** 2026-27" या लिंकवर क्लिक करून ऑनलाईन अर्ज करावा.
2. अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करून स्पष्ट दिसतील अशा स्वरूपात स्कॅन करून अपलोड करावीत.
3. अर्जातील सर्व माहिती पूर्ण व अचूक भरावी. अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**अटी व शर्ती :**

1. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक 26/06/2026 राहील.
2. पोस्टाने अथवा ई-मेलद्वारे प्राप्त अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी यांचेकडे राहतील.
4. कोणत्याही माध्यमातून अथवा अंतिम निवड प्रक्रिये दरम्यान किंवा प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्पावर उमेदवाराने सादर केलेली माहिती चुकीची, अपूर्ण अथवा दिशाभूल करणारी आढळल्यास त्यांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
5. कार्यालयीन वेळेत अर्ज प्रक्रियेबाबत कोणतीही अडचण असल्यास वनार्टीच्या Call Centre वर संपर्क साधावा.

**संपर्क :**

- **संपर्क क्रमांक** : 7887882026
- **ई-मेल** : **vanarti.info@gmail.com**
- **संकेतस्थळ** : **www.vanarti.in**

**स्वा**

**(प्रशांत वावगे)**

व्यवस्थापकीय संचालक (प्र)

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था,

(वनार्टी), नागपूर